# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte org.in Internet : www.dte.org.in


क्रमांक : १०/एआयसीटीई/पदविका/सेकंडशिफ्ट/मान्यता/२०११/ ८२५
दिनांक : 3 अक्तूबर OCT 2011

प्रति,
प्राचार्य,
के.बी.एच.एस.एस. ट्रस्टचे,
इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी,
भायगाव रोड, जाजूवाडीसमोर,
मालेगाव कॅम्प, मालेगाव-४२३१०५,
नाशिक.

**[5203]**
**(सेकंडशिफ्ट)**

विषय : **अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेस दुसऱ्या पाळीत अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत..**

संदर्भ : १) शासन निर्णय क्र.मान्यता-२००८/(१७/०८)/तांशि-६, दि.१४.०८.२००८.
२) शासन निर्णय क्रमांक : मान्यता-२०११/(१७३/२०११)/तांशि-५, दिनांक ३० जुन, २०११.
३) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्रमांक एफ.नं. वेस्टर्न/१-४०३२१८७८१/२०११/इओए, दि. १.९.२०११

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यांत येते की, शासनाने संदर्भाधीन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ साठी खालील पदविका अभ्यासक्रम त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या प्रवेशक्षमतेसह दुसऱ्या शिफ्टमध्ये सुरु करणेस विहीत अटींच्या अधिन राहून मान्यता दिलेली आहे. तसेच संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयातील तसेच खाली नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | अभ्यासक्रमाचा प्रकार | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १. | डिप्लोमा फार्मसी | दुसरी पाळी | ६० |

आपण संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व अध्यक्ष, के.बी.एच.एस.एस. ट्रस्ट, मालेगाव यांच्या संयुक्त खात्यात वरील अभ्यासक्रमांसाठी प्रत्येकी रुपये २.०० लाख, देना बँक, शाखा मालेगाव शहर येथे पावती क्रंमाक ३३५७४७९ दिनांक २१.९.२०११ अन्वये ५ वर्षे मुदतीसाठी नियतठेव म्हणून भरलेले आहेत. तसेच शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उर्वरीत खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून उपरोक्त नमूद केलेले पदविका अभ्यासक्रम सन २०११-२०१२ पासून दुसऱ्या शिफ्टमध्ये विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यांत येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. दुसऱ्या शिफ्टमध्ये अभ्यासक्रमासाठी प्रवेशक्षमता त्यांच्या नांवासमोर नमूद केलेल्या प्रवेश क्षमतेएवढी मर्यादित राहिल.

३. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक : टिईएम ३३८२/१११८३६/(१९०)तांशि-१(अ), दिनांक २१ मे १९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती संस्थेस बंधनकारक असतील.

ATTESTED
PRINCIPAL
K.B.H.S.S.T.'s Institute of Pharmacy
Malegaon Camp (Nashik)

४. संस्थेने दुसऱ्या शिफ्टमध्ये अभ्यासक्रम चालविण्यास स्वतंत्र प्राचार्य, पूर्णवेळ शिक्षक वृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यांत यावे. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

५. संस्थेतील कर्मचारी व शिक्षकांचे मासिक वेतन बँकेमार्फतच करावे.

६. दुसरी शिफ्ट सुरु ठेवण्यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेची दरवर्षी मुदतवाढ घेणे आवश्यक राहील.

७. आपल्या संस्थेला दुसऱ्या शिफ्टमधील अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यांत आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

८. दुसऱ्या शिफ्टसाठी संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

९. संचालक, या संचालनालयाचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ / शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबतची तपासणी करण्याचा अधिकार राहील व, तपासणीअंती आढळून येणाऱ्या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार संचालक / शासनास राहतील.

१०. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेने, संस्थेस दुसऱ्या शिफ्टसाठी मंजूरी दिलेल्या आदेशात नमूद केलेल्या बाबींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

११. अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

१२. संस्थेला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा,मुंबई, यांची सदर दुसऱ्या शिफ्टमधील अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

१३. दुसऱ्या शिफ्टमधील अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून शिक्षण शुल्क समिती, बांद्रा, मुंबई यांनी ठरवून दिल्याप्रमाणे शिक्षण शुल्क आकारणे बंधनकारक राहील. तसेच रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही व प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१४. शासनाने, या संचालनालयाने, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तींचे संस्था उल्लंघन करीत असल्यास संस्थेतील दुसऱ्या शिफ्टमधील अभ्यासक्रम बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

( डॉ. सुभाष महाजन )
प्र. संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सादर:-

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई.
२. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नाशिक.
४. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, औरंगाबाद.
५. कार्यासन क्रमांक २-अ मुख्य कार्यालय, मुंबई.
६. कार्यासन क्रमांक ३, श्री एस. डी. उपरवट, प्रणाली विश्लेषक, मुख्य कार्यालय, मुंबई.
७. निवड नस्ती.